■ सिद्धांत दोशी

(रसिकलाल एम. धारिवाल कॉलेज ऑफ फार्मसी, चिंचवड)

श्री जैन विद्या प्रसारक मंडळ संचलित रसिकलाल एम. धारिवाल कॉलेज ऑफ फार्मसी विभागाने श्रीमती गेंदीबाई ताराचंद चोपडा हायस्कूलमध्ये रक्तगट तपासणी शिबिर घेतले. सहावी ते बारावीतील ८६० विद्यार्थ्यांच्या रक्तगटाची तपासणी केली. विद्यार्थ्यांना त्यांच्या रक्तगटाची माहिती होणे आणि त्यांच्या स्वास्थ्याबद्दल त्यांना अधिक माहिती मिळणे, हा शिबिराचा उद्देश होता. प्रा. सुचिता खोत व प्रा. रेश्मा मिंढे यांचे सहकार्य लाभले. प्राचार्य डॉ. सचिन फेगडे यांनी मार्गदर्शन केले. शिबिरामध्ये डी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश धारिवाल. कार्याध्यक्ष शांतिलाल लुंकड, ऑनररी जनरल सेक्रेटरी ॲड. राजेंद्रकुमार मुथा, संस्थेचे कोषाध्यक्ष, प्रकाशचंद चोपडा यांचे मार्गदर्शन लाभले.

